## वादी तर्फे उलटतपास – श्री. आर. आय. पालकर, वकील.

**१५.** माझा ०३.०३.१९८० रोजी जन्म झाला आहे. माझ्या जन्मावेळी माझे आजोबा हयात नव्हते. वादी माझी मावशी असून तीने सदर दावा शेतजमिन विकत मिळण्यासाठी दाखल केला आहे. मला माझ्या जन्मापूर्वी माझी मावशी, आई आणि आजी यांच्यामध्ये काय व्यवहार झाले याबाबत माहिती नाही. मी दाखल केलेली लेखी कैफियत व पुराव्याचे शपथपत्र माझ्या सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आले आहे.

**१६.** माझे बारावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मला माझ्या आईचे लग्न कधी झाले याबाबत माहिती नाही. मी ते लग्न कोणी करून दिले याची माहिती घेतली आहे. मला मसणू सुतार यांच्या कडून माझ्या आईचे लग्न संतू केसरकर यांनी करून दिल्याचे कळाले आहे. मला वादीचे लग्न केव्हा झाले याबाबत माहिती नाही. माझे त्या लग्नावेळी ५–६ वर्ष वय होते. त्यावेळी मला समज नव्हती. मला घरी झालेल्या चर्चेतून ते लग्न माझ्या आई वडीलांनी आणि आजीने करून दिल्याचे समजले आहे. वादीचे तिच्या मामाच्या मुलाशी लग्न झालेले आहे.

**१७.** काळोजी पाटील हे वादीचे व माझ्या आईचे मामा आहेत. हे म्हणणे खरे नाही की, काळोजी पाटील माझ्या आजीला भेटायला किणे येथे येत होता. काळोजी पाटलाचा मृत्यू किणे येथे झाला आहे. काळोजी पाटील माझ्या जन्मापूर्वी वारलेले असल्यामुळे मला ते कधी वारले याबाबत सांगता येणार नाही.

**१८.** मला सगळया दावा मिळकतींबाबत माहिती आहे. सर्व दावा मिळकती या माझ्या आजोबांच्या वाडवडिलार्जित मिळकती आहेत. माझे वडिल १९९६ साली वारले आहेत. माझ्या वडिलांचे मुळ गाव तारेवाडी, ता. गडहिंग्लज आहे. माझ्या वडिलांची तारेवाडी येथे वाडवडिलार्जित शेती व घर मिळकत आहे. तारेवाडी येथे माझ्या वडिलांचे अथवा माझे चुलत भाऊबंद नाहीत. मी माझ्या वडिलांचा एकुलता एक मुलगा असून माझी बहिण मयत झाली आहे. आम्ही २०१३ साली तारेवाडी येथील संपूर्ण शेत जमिनीची विक्री केली आहे. मी त्याबाबतची कागदपत्रे हजर करू शकतो. तारेवाडी येथील आमची घर मिळकत सध्या पडसर आहे.

**१९.** माझ्या आजोबांना वादी व माझ्या आई व्यतिरिक्त इतर वारस नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, संतूच्या मृत्यू नंतर फेरफार क्र. १५५० नोंदवण्यात आला होता. मला त्याप्रमाणे वादी, माझी आई व आजीच्या नावाची वारस नोंद झाल्याची माहिती नाही. मला त्या फेरफारात ए.कु.पु. म्हणून लागल्याचे माहिती आहे. त्याबाबत वादी अथवा माझ्या आईची कोणतीही तक्रार नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझी आजी येसुबाईची काही ठिकाणी यशोदा नावाने नोंद झाली आहे. ती ८५ ते ९० वयोमानादरम्यान मयत झाली आहे. ती मृत्यूपूर्वी २० ते २५ वर्षापासून परावलंबी झाली होती. तीला गुडघेदुखी व कंबरेचा त्रास होता. ती पूर्णपणे दुस–यांवरती अवलंबून होती.

**२०.** आमचे व वादीचे दावा दाखल करण्यापूर्वी चांगले संबंध होते. आमचे वादीची मुले व पती यांच्यासोबत देखील चांगले संबंध होते. वादीने दावा दाखल करण्यापूर्वी पर्यंत आम्ही एकमेकांकडे सणा समारंभाला येत जात होतो. मला वादीने माझ्या आईच्या हयातीमध्ये नोंदणीकृत दस्ताने तिचा दावा मिळकतीतील हक्क सोडून दिल्याचे माहिती नाही. मी वादीने हक्कसोडपत्र केल्याबाबतची कोणतीही माहिती घेतलेली नाही.

**२१**. मी दावा मिळकतींचे ७/१२ उतारे पाहिलेले आहेत. गट क्र. ५० चे एकूण क्षेत्र १५ गुंठे, गट क्र. ५१ चे एकूण क्षेत्र १ एकर ५ गुंठे, गट क्र. ९५ चे एकूण क्षेत्र ५५ गुंठे, गट क्र. १७६ चे एकूण क्षेत्र २० गुंठे, गट क्र. २१५ चे एकूण क्षेत्र १५ गुंठे, गट क्र. २४७ चे एकूण क्षेत्र ४ एकर, गट क्र. ८०० चे एकूण क्षेत्र २० गुंठे आणि गट क्र. ८७९ चे एकूण क्षेत्र १ एकर ५ गुंठे आहे. सदरचे सर्व क्षेत्र माझ्या आईच्या वडिलांकडे त्यांच्या वाडवडीलांकडून आलेले आहे.

**२२**. दावा घर मिळकत परसु आणि घराची आहे. त्या घरामध्ये वादी आल्यावरती सण समारंभ करत होती. ते घर सध्या पडलेले आहे. त्या घराच्या ठिकाणी आम्हाला नवीन घर बांधायचे होतो. माझी आई २०१५ साली वारली आहे. माझे २००९ साली लग्न झालेले आहे. मी आई वारल्यानंतर त्या घरात रहात असल्यामुळे ते पडल्यावर बांधायचा प्रयत्न केला होता. मी सध्या भाडयाच्या घरात रहात आहे. मी बांधकाम करत असल्यामुळे वादीने मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केला होता. त्यामध्ये न्यायालयाने मला बांधकाम करू नये असे आदेश दिले होते. मी त्या आदेशा विरोधात वरील

न्यायालयात दाद मागितली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मनाई हुकुम अस्थित्वात असताना पुन्हा बांधकामाचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत माझ्या विरोधात आजरा पोलीसात तक्रार झाल्या होत्या.

**२३**. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा प्रलंबित असताना शेतजमिनीती आंबा व फणसाची झाडे तोडली होती. माझे आजोबा संतू मुंबई येथे नोकरी करताना अपघातात मयत झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आजीला अपघाताची रक्कम मिळाली होती. मला त्यावेळी माझ्या आजी आजोबांची आर्थिक परिस्थीती कशी होती याबाबत सांगता येणार नाही. माझ्याकडे माझ्या आई वडिलांना आजीने घरजावई म्हणून स्वतःकडे ठेवून घेतल्याबाबत तोंडी पुराव्या शिवाय इतर कागदोपत्री पुरावा नाही. माझ्याकडे आजी येसूबाईकडे ३० तोळे सोने असल्याबाबतचा माझ्या तोंडी पुराव्याशिवाय इतर पुरावा नाही.

**२४.** मला माझ्या वडिलांनी माझ्या आईसाठी सोने तयार करून ठेवल्याचे माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या लग्नामध्ये आजीने तिला ८ तोळे सोने दिल्याचे खोटे सांगत आहे. मला वादीच्या लग्नात तिला दिलेल्या वस्तूंबाबत वयैक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजीच्या हयातीत दावा मिळकतीच्या वादी व माझ्या आईमध्ये वाटण्या झालेल्या नाहीत.

**२५**. मला १९८८ साली नेमके काय झाले होते याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी १९८८ साली वादीने दावा मिळकतीतील हिस्सा सोडल्याच्या बदल्यात माझ्या आईने व आजीने तिला ३० तोळे सोने दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने कधीही माझ्या आईच्या हक्कात तिचा दावा मिळकतीतील हिस्सा सोडून दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकत हडप करण्यासाठी वादीने हक्क सोडून दिल्याचे खोटे सांगत आहे.

**२६**. मागिल चार वर्षापासून आमच्या गावात पाण्याची सोय झालेली आहे. दावा मिळकतीमध्ये नाचणा, भात व भुईमुगाची पिके घेतली जात होती. सध्या दावा मिळकतीत ऊसाचे पिक घेतले जात नाही. दावा मिळकतीमध्ये कधीही ऊसाचे पिक

घेतलेले नाही. आम्ही दावा मिळकतीतून पोटापुरते होणारे भाताचे उत्पन्न स्वतःसाठी ठेवून संपूर्ण गवत वादीला देत होतो. आम्ही वादीला साधारणपणे ८ ते ९ वर्षापुर्वी पर्यंत गवत देत होतो. आम्ही १० ते १५ वर्षे वादीला दावा मिळकतीतील गवत दिले आहे. माझ्याकडे त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नसून साक्षीदार आहे. मी आता त्या साक्षीदाराचे नाव सांगू शकत नाही.

**२७**. दावा मिळकतीमधून वर्षाला आम्हाला साधारणपणे १००००/– चे उत्पन्न मिळत होते. दावा मिळकतीमध्ये आंबा, फणस, मेसकाठीची झाडे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यातिल काही झाडे आम्ही तोडलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीतून आम्हाला वर्षाला खर्च वजा जाता पाच लाखाचे उत्पन्न मिळत होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दावा मिळकतीतून येणा–या पिकाची रक्कम वादीला दिलेली नाही. मला सदर रक्कम वादीला किती, कोणत्या वर्षी आणि कोणासमोर दिली होती ते आठवत नाही. मी आजी व आई वारल्यापासून संपूर्ण दावा मिळकतीचे उत्पन्न एकटाच घेत आहे.

**२८.** मी दावा मिळकत गट क्र. २४७ व ९५ मधील जमिनीची आजी येसुबाईकडून सन २०११ साली खरेदी केली आहे. माझ्याकडे सन २०११ पुर्वी आजी आजारी असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. मी २०११ पुर्वी कोणताही व्यवसाय करत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आजी हयात असताना व त्यानंतर आमच्या कुटुंबाचा संपूर्ण उदरनिर्वाह दावा मिळकतीच्या उत्पन्नावर होत होता. मी नोकरी करत असल्याबाबतचा पुरावा दाखल करू शकतो.

**२९**. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २०११ पुर्वी येसुबाईला रोखीने पैसे दिले नाहीत. मी आजी येसुबाईला खरेदीपत्रा दिवशी रक्कम दिली आहे. मी तिला खरेदीपत्रा दिवशी दोन लाख ऐंशी हजाराची रक्कम दिली आहे. मी सदर रक्कम तिला दस्त लेखनीकाच्या कार्यालयात दिली होती. मी तिला संपूर्ण रक्कम पाचशे रुपयांच्या नोंटामध्ये दिली होती. मला सदर रक्कमेचे तिला किती बंडले दिले होते याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजीला कोणतीही रक्कम खरेदीपत्रा दिवशी दिलेली नाही. मी माझा चुलत भाऊ प्रदिप देसाई याच्याकडून दोन लाख ऐंशी हजार

रुपये हातउसने घेतले होते. मी त्या रक्कमेमध्ये आजी येसुबाईची चार एकर जमीन खरेदी केली आहे. मला खरेदीपत्रा रक्कम केव्हा दिली व मिळाली याबाबत काय मजकूर लिहिला आहे याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या चुलत भावाकडून कधीही दोन लाख ऐंशी हजार रुपये हात उसने घेतलेले नाहीत.

**३०.** मी मसणू सुतारच्या गाडीतून आजी येसुबाईला खरेदीपत्र करण्यासाठी आणले होते. हे म्हणणे खरे नाही की, आजीने स्वतःहून विक्रीचे स्टॅम्प घेतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आजी येसुबाईने शेतजमिनी विक्री करण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आजी येसुबाईला खरेदीविक्रीची कोणतीही माहिती न देता तिच्याकडून खरेदीदस्त करून घेतला आहे. मी स्वतः आजी येसुबाईला धरून रजिस्टर ऑफिसमध्ये गेलो होतो.

**३१.** तो दस्त कांबळे बॉन्ड रायटर यांनी लिहिला होता. मी खरेदीदस्त करण्यापूर्वी वादीला त्याबाबत कळवले नव्हते. मी खरेदीसाठी वादीची लेखी संमती घेतलेली नाही. वादी येत नाही असे म्हणाल्यामुळे मी तिची संमती घेवू शकलो नव्हतो. माझ्या गावापासून वादीचे गाव २२ किमी अंतरावरती आहे. मला वादीकडे स्वतः जावून खरेदीसाठी तिची संमती घेण्यास कोणतीही अडचण नव्हती. मला आजीने वादीला कळविल्याबाबत सांगितले होते. मला आजीने कोणामार्फत व केव्हा वादीला कळवले होते याची माहिती नाही.

**३२.** आजी येसुबाई अडाणी व अशिक्षित होती. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीत वादीचा हक्क असताना आजीची फसवणूक करून चुकीची खरेदी केली आहे. मी खरेदीपत्र वाचून पाहिलेले असून त्यावेळी माझी आई हयात होती. मी त्यावरती आईची साक्षीदार अथवा संमतीदार म्हणून स्वाक्षरी घेतली नाही. खरेदीपत्राच्या दुस–या दिवशी त्याबाबतचा फेरफार क्र. १२५४ नोंदविण्यात आलेला आहे. तो नोंदवण्यापुर्वी वादीला नोटीस देण्यात आली नव्हती. मला सदरची नोंद करतेवेळी तलाठी व सर्कल अधिकारी कोण होते आठवत नाही. मला तलाठी अथवा सर्कल अधिका–यांनी नोंद घेण्यासाठी नोटीसा काढण्यासह ६० दिवस थांबावे लागेल याबाबत सांगितले नव्हते. मी दावा दाखल करेपर्यंत वादीला खरेदीची माहिती दिलेली नाही. मी खरेदी घेतल्यानंतर

दावा दाखल करेपर्यंत वादीला त्याची माहिती देण्याबाबत कोणतीही कायदेशिर अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दि. ११.१०.२०११ रोजी गट क्र. ९५ व २४७ मध्ये वादीचा हिस्सा होता. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा हिस्सा हडपण्यासाठी मी विनामोबदला वरील मिळकतीचे येसुबाईकडून खरेदीपत्र करून घेतले.

**३३**. दावा दाखल करण्यापूर्वी माझी वादीसोबत एक बैठक झाली होती. त्या बैठकीत वादीने तिचा हिस्सा देण्याची मागणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला वाटणी देण्यास नकार दिला होता. ती बैठक अध्यक्ष मसणू सुतार यांचेसमोर झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी वाटून देण्यास तयार नसल्यामुळे समितीने ते प्रकरण निकाली काढले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी केलेल्या खरेदीपत्रामुळे माझा व वादीचा वाद सुरू झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजीचा हयातीपर्यंत वादीचा दावा मिळकतीमध्ये १/३ आणि आजीच्या मृत्यूनंतर सध्या १/२ हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ९५ व २४७ यांचे क्षेत्र इतर गटातील जमिनीपेक्षा जास्त आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गटांचे क्षेत्र जास्त असून त्यातून चांगले उत्पन्न मिळकत असल्यामुळे वादीचा हक्क डावलण्यासाठी खोटे खरेदीपत्र करून घेतले असून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०२.०२.२०२६. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.